**कृपया प्रसिध्दीसाठी** **29 एप्रिल 2012**

## मच्छिमारांना 4 टक्के व्याज आणि डिझेलचा परतावा सुरु करण्यासाठी पुढाकार घेण्याचे कृषी मंत्री श्री. शरद पवार यांचे आश्वासन

**मुंबई, रविवार:** मच्छिमारांना मिळणा-या कर्जावरच्या व्याजाचा दर 4 टक्के करण्यासाठी तसेच डिझेलवरील परतावा प्रति लिटर रु.4 करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आश्वासन कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक यांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या भारतीय जनता पार्टीच्या शिष्टमंडळास गुरुवारी दिल्ली येथे दिले. शिष्टमंडळात खासदार श्री. पियुष गोयल, आमदार श्री.चिंतामण वनगा, महाराष्ट्र राज्य मच्छिमार सहकारी संघाचे अध्यक्ष श्री. राजेंद्र मेहेर, श्री. रामदास मेहेर तसेच बोरीवलीच्या नगरसेविका श्रीमती मनिषा चौधरी, वसई-विरार महानगरपालिकेचे नगरसेवक श्री.राजन नाईक, भाजपा महाराष्ट्र आय टी सेलचे श्री. विनित गोयंका यांचा समावेश होता. चर्चेच्यावेळी कृषी मंत्रालयातील संबंधित अधिकारीही उपस्थित होते.

चर्चेसंबंधी अधिक माहिती देताना श्री. राम नाईक म्हणाले,''मच्छिमार संस्थांना नॅशनल कोऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (एनसीडीसी) यांच्याकडून महाराष्ट्र सरकारच्या मार्फत जे कर्ज मिळते त्यावर जवळ-जवळ 13 टक्के व्याज आकारण्यात येते. 2012-2013 च्या वार्षिक अर्थसंकल्पात अर्थ मंत्री श्री. प्रणव मुखर्जी यांनी शेतक-यांसाठी 7 टक्के व्याज दराने कर्ज देण्याची घोषणा करुन जे शेतकरी वेळेवर हप्ते भरतील त्यांना 3 टक्के परतावा देण्याचे जाहिर केले आहे. म्हणजेच नियमित हप्ता भरणा-या शेतक-यांना 4 टक्के व्याज दराने कर्ज मिळणार आहे. मच्छिमारी ही समुद्रावरील शेतीच मानली जाते. त्यामुळे मच्छिमारांनाही 4 टक्के व्याज दराने कर्ज मिळाले पाहिजे अशी मागणी श्री. राम नाईक आणि श्री. राजेंद्र मेहेर यांनी केली. कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी ही मागणी रास्त असल्याचे सांगून अर्थ मंत्र्यांशी चर्चा करुन 4 टक्के व्याज दर मंजूर करण्याचे आश्वासन दिले.''

कर्जावरील व्याज दराच्या बरोबरच डिझेलवर पूर्वी मिळत असलेल्या परताव्यासंबंधीही शिष्टमंडळाने चर्चा केली. मच्छिमारांना लागणा-या डिझेलवर श्री. राम नाईक यांच्या मागणीवरुनच प्रथमतः 1990 मध्ये प्रा. मधु दंडवते अर्थ मंत्री असताना 'विकास परतावा' 35 पैसे प्रति लिटर देण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर डिझेलचे दर वाढल्यामुळे पेट्रोलियम मंत्री असताना श्री. राम नाईक यांनी हा परतावा रु. 1.50 केला. त्यानंतर डिझेलचे दर आणखीनच वाढले म्हणून मच्छिमारांच्यावतीने रु.4 परतावा देण्याची मागणी करण्यात आली होती. त्या मागणीला प्रतिसाद देत 19 फेब्रुवारी 2009 रोजी अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या कालखंडासाठी म्हणजे 2007-08 ते 2011-12 या वर्षासाठी रु. 3 परतावा देण्यास भारत सरकारने मान्यता दिली. परंतु त्यामध्ये एक अट घालून दारिद्र्य रेषेखालच्या मच्छिमारांनाच हा परतावा मिळेल असे सांगितले. ज्याच्याकडे मच्छिमारीची डिझेलवर चालणारी बोट आहे तो दारिद्र्य रेषेखालचा असूच शकत नाही

..2..

ही बाब श्री. राम नाईक यांनी कृषी मंत्री, अर्थ मंत्री तसेच पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांच्या निदर्शनास आणून दिली. तथापि, त्यांनी ही अट न बदलल्यामुळे गेली 5 वर्षे मच्छिमारांना परतावाच मिळत नाही. ही बाब चर्चेमध्ये भाजपा शिष्टमंडळाने कृषी मंत्री श्री. शरद पवार यांच्या निदर्शनास आणून देऊन पुन्हा वाढलेल्या डिझेलच्या किंमतीमुळे परतावा रु.4 करण्याची मागणी केली. त्याबद्दल प्रतिसाद देताना हा विषय पुन्हा एकदा पंतप्रधान आणि अर्थ मंत्री यांच्याशी चर्चा करुन डिझेलवरील परतावा निदान 2012-13 वर्षापासून प्रारंभ होणा-या बाराव्या पंचवार्षिक योजनेपासून सुरु करण्याचा प्रयत्न करीन असे आश्वासन कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी दिले, असे श्री. राम नाईक म्हणाले.

समुद्र किना-यावरील पाणी प्रदुषित झाले असल्यामुळे मच्छिमारांना राज्य सरकारच्या कार्यकक्षेत असलेल्या 12 नॉटिकल मैलांच्यापलीकडे जाऊन आता समुद्रावर मच्छिमारी करावी लागते. परंतु 12 नॉटिकल मैलांच्या पलीकडील एक्स्लुझिव्ह इकॉनॉमिक झोन (इझेड्) मध्ये अनेकदा मच्छिमारांच्यात आपसात तसेच इतरांच्या बरोबर संघर्ष होतात, त्यासाठी कोणताच कायदा अस्तित्त्वात नाही. अशा प्रकारचा कायदा करण्यासाठी वेगवेगळ्या मंत्रालयांच्या मध्ये चर्चा चालू असल्याचे कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी 17 मार्च 2009 रोजी श्री. राम नाईक यांना पत्राद्वारे कळविले होते. त्या कायद्याचे काय झाले असा प्रश्न शिष्टमंडळाने उपस्थित केला असताना गृह खात्याकडून अद्याप निर्णय झाला नसल्याचे श्री. शरद पवार यांनी सांगितले. त्याचबरोबर ‘समुद्रावरील कायदा आणि व्यवस्था’ हा प्रश्न गंभीर असल्यामुळे तो सोडविण्याच्या दृष्टीने पुढाकार घेण्याचे आश्वासनही श्री. शरद पवार यांनी दिले, असेही श्री. राम नाईक यांनी पत्रकाच्या शेवटी म्हटले आहे.

**(कार्यालय सचिव)**